ठाणे, बुधवार दि. ८ मे २०२४ वर्ष : १३, अंक : १०, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

लोकसभेचा संग्राम

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध संपादक : चंद्रकांत भोईटे


**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुला अतृप्त आत्मे पाहण्याचे खूळ लागलं आहे. ते पहायचे असतील तर निवडणुकीच्या प्रचारसभेत भेटतील.

**थोडक्यात घडामोडी**



### सलमान खान गोळीबार प्रकरणी पाचवा आरोपी अटकेत; राजस्थानमधून मुसक्या आवळल्या

बॉलिवूडचा दबंग अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांना आणखी एक यश मिळाले आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणातील पाचव्या आरोपीला अटक केली आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने राजस्थानमधून आरोपीच्या मुसक्या आवळल्या. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने राजस्थानमधून अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद रफिक चौधरी असे असल्याची माहिती सूत्रांनी दिली. चौधरी याने या प्रकरणात अटक केलेल्या सागर पाल आणि विकी गुप्ता या दोन शूटर्सना पैसे आणि रेकी करण्यासाठी मदत केली होती. आरोपी चौधरीला याला आज पोलीस मुंबईत आणणार असून त्याला न्यायालयात हजर करत पोलीस कोठडीची मागणी करणार असल्याची माहिती आहे.

### ट्रकमधून केमिकल पावडर पडली - ठण्याकडील वाहतूक ठप्प

ठाणे – अशोक लेलँड कंपनीचा आयशर ट्रक २५ टन केमिकल पावडर (Phthalic anhydride) घेऊन निघालेल्या ट्रक मधुन ३ केमिकल पावडर रस्त्यावर पडल्याने ठाण्याकडे जाणारी वाहतूक अर्धातास ठप्प झाली. सदरची घटना सोमवारी(ता – ६ में) रोजी रात्री ११-४५ वाजता घडली. या घटनेत कुणीही जखमी नाही. कल्याण शिव फाटा येथून ठाण्याकडे निघालेल्या अशोक ट्रक मधून तीन टन केमिकल पावडर रस्त्यावर सांडल्याने ठाण्याच्या वाहिनीवर ठाण्याकडे जाणाऱ्या वाहतुकीचा खोळंबा झाला. तब्बल अर्धा तास वाहतूक ठप्प झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.अशोक लेलँड कंपनीचा आयशर ट्रक २५ टन केमिकल पावडर घेऊन तळोजा ते देहेज, गुजरातकडे निघाला. रस्त्यात ३ टन केमिकल पावडर रस्त्यात पडल्याने (पान २ वर)

### गारव्याचा अनुभव....



(छाया– मनोज सिंह)

काही दिवसांपासून उन्हाचा पार वाढल्यामुळे उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना काल आकाशात काळे ढग आल्याने वातावरणात अचानक बदल झाला... काहीसा गारवा जाणवू लागला होता.

# राज्यात तिसऱ्या टप्प्यात 54,09 टक्के मतदान

■ कोल्हापुरात सर्वाधिक,

■ तर बारामतीत सर्वात कमी मतदान

**मुंबई: राज्यातील सर्वाधिक लक्ष्यवेधी असणाऱ्या ११ लोकसभा मतदारसंघासाठी आज मतदान होत असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत फक्त ५३.४० टक्के मतदान झाल्यांच समोर आलं आहे. त्यामध्ये सर्वाधिक कोल्हापूरमध्ये ६३.७१ तर हातकणंगले लोकसभा मतदारसंघात ६२.१८ टक्के मतदान झालं. सर्वात कमी मतदान बारामतीमध्ये झालं असून ४५.६८ टक्के मतदान झाल्याने दोन्ही उमेदवारांची धाकधूक वाढल्याचं दिसत आहे.**

### बारामतीमध्ये सर्वाधिक कमी मतदान

राज्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४५.६८ टक्के मतदान झालं. इतर मतदारसंघांच्या तुलेनेत हे मतदान कमी असल्याचं दिसतंय. बारामतीमध्ये यावेळी सुप्रिया सुळे विरूद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होत असून शरद पवार आणि अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

### कोल्हापूर आणि हातकणगले आघाडीवर

राज्यातील तिसऱ्या टप्प्यामध्ये ११ मतदारसंघात निवडणूक होत असून त्यामध्ये आतापर्यंत सर्वाधिक मतदान हे कोल्हापूर आणि हातकणंगलेमध्ये झाल्याचं दिसतंय. सायंकाळी पाच वाजेपर्यंत कोल्हापूरमध्ये ६३.७१ तर शेजारच्या हातकणंगलेमध्ये ६२.१८ टक्के मतदान झालं आहे. कोल्हापूरमध्ये महाविकास आघाडीचे शाहू महाराज आणि शिवसेनेचे संजय मंडलिक अशी लढत होत आहे.



**तिसऱ्या टप्प्यातील एकूण ११ लोकसभा मतदारसंघनिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| ■ लातूर –५५.३८ टक्के | ■ सांगली –५२.५६ टक्के |
| ■ बारामती –४५.६८ टक्के | ■ हातकणंगले –६२.१८ टक्के |
| ■ कोल्हापूर –६३.७१ टक्के | ■ माढा –५०.०० टक्के |
| ■ उस्मानाबाद –५२.७८ टक्के | ■ रायगड –५०.३१ टक्के |
| ■ रत्नागिरी –सिंधुदुर्ग– ५३.७५ टक्के | |
| ■ सातारा –५४.११ टक्के | ■ सोलापूर –४९.११ टक्के |

राज्यातील प्रमुख लढती ...(पान २ वर)

# नकली नोटा चलनात आणण्याचा प्रयत्न फसला

■ दिल्लीतील युवकाला कल्याणमध्ये अटक

कल्याण – नकली नोटा चलनात आणणाऱ्या दिल्लीमधील एका युवकाला कल्याण महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे. अंकुश सिंह असे युवकाचे नाव असून त्याच्याकडून पोलिसांनी १३ हजार रुपयांच्या नकली नोटा जप्त केल्या आहेत अशी माहिती महात्मा फुले पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली. कल्याण पश्चिमेतील स्टेशन परिसरातील बाजारपेठ एक तरुण शंभर दोनशे रुपयांमध्ये काही वस्तू खरेदी करीत आहे. परंतू तो ज्या नोट्या देत आहे. त्या नोटा नकली असल्याचा संशय एका फळ विक्रेत्याला आला. त्याने याची माहिती त्याच्या मित्राला दिली.



मित्राने ही माहिती कल्याणच्या महात्मा फुले पोलिस स्टेशनच्या पोलिसांना दिली. या गोष्टींचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ स्टेशन परिसरात त्या व्यक्तीचा शोध सुरु केला. अवघ्या २० मिनिटात पोलिसांनी (पान २ वर)

भाजपाची नाराजी दूर, आता प्रचार जोरात

# नरेश म्हस्केंनी घेतला गणेश नाईकांचा आशीर्वाद



नवी मुंबई – ठाणे लोकसभा सभा क्षेत्रात महायुतीकडून अखेर शिवसेनेचे नरेश मस्के यांना उमेदवारी जाहीर झाली. मात्र त्यानंतर नवी मुंबई येथील भाजपाचे नेते गणेश नाईक आणि त्यांचे सूपुत्र संजीव नाईक यांचे कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचे नाराजी नाट्य पाहिला मिळाले होते. दरम्यान नरेश मस्के त्यांना भेटायला गेले असतात त्यांची भेट झाली नव्हती. अशा चर्चा देखील रंगल्या होत्या. मात्र नरेश मस्के यांनी अर्ज भरतानाच गणेश नाईक यावेळी उपस्थित असल्याने या नाराजी नाट्यावर पडदा पडला होता.

### नरेश म्हस्के यांनी गणेशजी नाईक यांचे आशीर्वाद घेतले

आता पुन्हा एकदा महायुतीचे उमेदवार नरेश मस्के यांनी आज माजी मंत्री व ठाणे जिल्हाचे माजी पालकमंत्री गणेशजी नाईक यांची नरेश म्हस्के यांनी सदिच्छा भेट घेतली. निवडणुकीतील विजयासाठी नरेश म्हस्के यांनी गणेशजी नाईक यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी माजी खासदार डॉ.संजीवजी नाईक, माजी आमदार संदीपजी नाईक, माजी महापौर सागरजी उपस्थित होते.

### गणेश नाईक आपल्याबरोबरच आहेत

तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने यावेळी नरेश म्हस्के आणि गणेशजी नाईक यांच्यात चर्चा झाली. प्रचारसभा, चौक सभा, जाहीर सभेबरोबरच घरोघर जाऊन मतदारांपर्यंत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोदी सरकारचे निर्णय पोहोचवले पाहिजेत. अबकी बार ४०० पार खासदार निवडून यायलाच हवेत अशी भूमिका उपस्थित सर्वांनी व्यक्त केली. गणेश नाईक आपल्याबरोबरच आहेत, असा जणू एक संकेतच दिलेला पाहिला मिळाला. तसेच विजयासाठी नरेश म्हस्के आशीर्वाद दिले आहेत.

### मिरा भाईंदरमधील भाजपाचे नाराजी नाट्य संपुष्टात, नरेश म्हस्के यांच्या प्रचारात भाजप सक्रीय

भाईंदर : ठाणे लोकसभेची जागा शिंदे गटाकडे गेल्याने मिरा भाईंदरमधील भाजपात निर्माण झालेला नाराजी अखेर दूर झाली आहे. मंगळवारपासून भाजप पदाधिकाऱ्यांनी महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचाराला सुरवात केली आहे. ठाणे लोकसभेची जागा ही शिंदे गटाकडे गेल्याने मिरा भाईंदर शहरात भाजप मध्ये नाराजी पसरली होती. भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी तर शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार (पान २ वर)

#### भाजपची उत्तर भारतीय मतदारांना हाक

नाराजी नाट्य संपुष्टात आल्यानंतर झालेल्या पहिल्याच प्रचार सभेत भाजपने उत्तर भारतीय मतदारांना आकर्षित करण्याला प्राधान्य दिले. यासाठी मिरा रोड येथे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी उत्तर प्रदेश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजप महाराष्ट्र राज्याचे प्रभारी दिनेश शर्मा यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी केवळ निवडणुकीपुरते महायुतीचे उमेदवार नरेश मस्के यांना निवडून आणावे असे आव्हान त्यांनी मतदारांना केले.

# ठाण्याला लागलेला गद्दारीचा कलंक पुसायचा आहे !

### शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांना मतदारांची साथ

**ठाणे – महाविकास आघाडी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजन विचारे या सच्चा शिवसैनिकाला मतदारांनी साथ दिली आहे. गद्दारांना धडा शिकवण्याची हीच वेळ असून ठाण्याला लागलेला गद्दारीचा कलंक आपल्याला पुसायचा आहे. अशी साद घालत विचार यांनी आज जोरदार प्रचार केला. ठाणे लोकसभा मतदारसंघात गेल्या १० वर्षात केलेली कामे,युद्धपातळीवर सुरू असलेली प्रकल्प त्याचबरोबर भविष्यात नव्या दर्जेदार सुविधा देण्यासाठी मी कटिबध्द असल्याचा विश्वास विचारे यांनी मतदारांना दिला. यावेळी जागोजागी मतदारांनी तुफान प्रतिसाद देत विचारे यांचे स्वागत केले.**



त्यावेळी जिल्हाप्रमुख केदार दिघे, प्रवक्ता अनिश गाढवे, संपर्कप्रमुख सुभाष म्हसकर, उप जिल्हाप्रमुख सुनील पाटील, राजेंद्र महाडिक, समन्वयक संजय तरे, सह समन्वयक राम काळे, विभाग प्रमुख वासुदेव भोईर, अरविंद भोईर, साईनाथ पाटील, मयूर पैलकर, प्रतिक राणे, जिवाजी कदम, पप्पू आठवाल, युवासेना अधिकारी किरण जाधव, राज वर्मा, महिला उपविभाग (पान २ वर)

### अभ्यास कमी असल्याने भाषणात वायफळ बडबड - विचारे


या प्रचार रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने विरोधकांची पायाखालची वाळू घसरली असून त्यांना चांगलाच घाम फुटलेला असल्याचा आरोप विचारे यांनी केला. त्यामूळेच वायफळ भाषण करण्यात ते व्यस्त आहेत. मुळात लोकसभा सारख्या निवडणुकीत देशहिताचे, राष्ट्रहिताचे, राज्याच्या दृष्टिकोनातून विकासाचे मुद्दे मुख्यमंत्र्यांनी बोलायला हवेत. मात्र त्यांचा अभ्यास कमी असल्याने भाषणात वायफळ बडबड करून जाणीवपूर्वक मतदारांची दिशाभूल करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप राजन विचारे यांनी केला.

# कल्याणमध्ये होणार दिग्गज नेत्यांच्या सभा

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे या दिग्गज नेत्यांच्या सभा

**लोकसभेच्या चौथ्या टप्प्यातील निवडणूक जवळ येऊ लागली आह, तसतसे राजकीय वातावरण तापू लागले आहे. कल्याण लोकसभेत मुख्यमंत्री शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत हे उमेदवार असून येथे शिंदे व ठाकरे गटात लढत होत आहे. तर भिवंडी मतदारसंघात कपिल पाटील यांच्याविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे हे उभे असून तेथे तिहेरी लढत होणार आहे.**

मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र व केंद्रीय राज्यमंत्री पाटील हे दोघेही आपली हॅट्रिकसाठी झटत असून या मतदारसंघाना महत्व आले आहे. महायुती व महाविकास आघाडीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी, शरद पवार, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे बडे नेते या उमेदवारांच्या प्रचार सभांसाठी पुढील आठवड्यात कल्याण डोंबिवलीत असून निवडणूकीचे रणांगण दणाणून सोडणार आहेत. (पान २ वर)



■ १२ मे रोजी डोंबिवलीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे खासदार शिंदे यांच्या प्रचारार्थ जाहिर सभा घेणार आहेत.

■ १३ मे रोजी डोंबिवलीत सावळाराम क्रीडा संकुल मध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे सभा घेणार आहेत,

■ १२ मे रोजी भिवंडी लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र (बाळया मामा) म्हात्रे प्रचारार्थ शरद पवार हे स्वतः सभा शहापूर आणि कल्याणमध्ये घेणार आहेत.

■ १५ मे रोजी मोदी पंतप्रधान कल्याण पश्चिमेत सभा घेणार आहेत.

ठाणे आणि डोंबिवलीकरांसाठी खुशखबर!

# शिळफाट्याचा प्रवास आता सुस्साट होणार

ढहरपश छ्शुी: शिळफाटा उड्डाणपूलाच्या आणखी तीन मार्गिका सेवेत. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने उड्डाणपुलाची उभारणी. आता ठाणेकर, नवी मुंबईकरांचा प्रवास सुखकर होणार. जाणून घ्या काय फायदा होणार?

इठाणे : ह. भ. प. संत सावळाराम महाराज कल्याण शीळ मार्गावरून कल्याण, डोंबिवली ते ठाणे, नवी मुंबई प्रवास आता आणखी वेगवान होणार आहे. या मार्गावरील शिळफाटा येथील उड्डाणपुलाच्या आणखी तीन मार्गिका नुकत्याच खुल्या करण्यात आल्या आहेत. या मार्गिकांमुळे शिळफाटा चौकातला प्रवास अधिक वेगवान झाला आहे. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापुरातून ठाणे, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना कोंडीमुक्त प्रवास करता येणार आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने या उड्डाणपुलाची उभारणी (पान २ वर)

#### शिळफाटा सहापदरी उड्डाणपुलाची वैशिष्ट्ये

■ एमएमआरडीएच्या माध्यमातून ११९ कोटी रुपयांच्या निधीतून पुलाची या पुलाची उभारणी करण्यात आली आहे.

■ ७४० मीटर लांब आणि १२ मीटर रुंद असा हा उड्डाणपूल आहे.

■ या पुलामुळे शिळफाट्याची वाहतूक कोंडीची समस्या कायमची मार्गी लागली आहे.

### फ्लायओव्हरच्या तीन लेन सुरु



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## केंद्र सरकारचे प्रताप

धुळे येथे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना उद्देशून, तुमची आता एक्सपायरी डेट संपत आली आहे, असे विधान केले होते. या विधानाला प्रत्युत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, भाजपाने आजपर्यंत धुळेकरांचे कोणते प्रश्न सोडवले? सध्या कांद्याची निर्यातबंदी सुरु आहे. केंद्र सरकार गुजरातच्या शेतकऱ्यांची कांद्याची निर्यातबंदी उठवतात. पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कांद्याची निर्यातबंदी उठवत नाहीत, म्हणजे हे महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये भेदभाव करत आहेत. मग गेल्यावेळी याच महाराष्ट्राने ४० पेक्षा जास्त खासदार निवडून दिले होते. त्यामुळे मोदी तुम्ही दिल्ली पाहिली. मात्र, यावेळी महाराष्ट्र तुम्हाला दिल्लीपर्यंत पोहोचू देणार नाही. आम्हाला विचारतात की, महाविकास आघाडी किती जागा जिंकणार? आम्ही ४८ जागा लढवत आहोत आणि ४८ जागा जिंकणार, असे उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. ते धुळ्यातील महाविकास आघाडीच्या सभेत बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नगरच्या सभेत बोलताना केलेल्या एक्सपायरी डेटच्या टीकेलाही प्रत्युत्तर उद्धव ठाकरे यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधकांना हिणवत असतात, त्यांना कमी लेखत असतात, या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी हे विधान केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच नगरमध्ये एक सभेत बोलताना म्हणाले, ४ जूनला इंडिया आघाडीची एक्सपायरी डेट आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदींवर टीका करत इशारा दिला आहे की, तुमचा बुरशी आलेला माल लोकांनी पाहिला. तो ४ जूनला आम्ही केराच्या टोपलीत फेकून देणार आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली घटना ही या गोमूत्रधाऱ्यांना आता ओझे व्हायला लागली आहे. त्यामुळे त्यांना ४०० पार खासदार करून संविधान बदलायचे आहे. मात्र, त्या संविधानाचे रक्षण आपल्याला करायचे आहे. या लोकांनी शेतकऱ्यांशी गद्दारी केली आहे, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला. गेल्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजप विरोधात जनतेची चर्चा सुरू आहे. कारण गेल्या पाच वर्षांत जी झालेली अनागोंदी, हिंसाचार आणि आर्थिक अनिमितता या पार्श्वभूमीवर जनतेचे मत संतप्त असल्याचे दिसते. त्यामुळे भाजप विरोधात जनमत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मोदी सरकारने हे केले, मोदी सरकारने ते केले अशी सरकारच्या नावाने जाहिरात करत आहे. आणि अशी जाहिरात जनतेला न पटण्यासारखी आहे. एकूणच देशांमध्ये मोदीशाही सुरू असल्याचा भास जनतेला होत आहे. या भावनेतून विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना दिसत आहेत.

उद्धव ठाकरे भाजपावर टीका करताना असे म्हणाले की, भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार हे बहिण भावाच्या नात्यावर काय बोलले ते पाहा. हीच का भाजपाची संस्कृती. ज्यांना बहिण भावाचे नाते माहिती नाही, ते भाजपावाले आम्हाला काय हिंदुत्व शिकवणार? तुमच्याकडून आम्ही हे हिंदुत्व शिकायचे का? ते म्हणतात की, नरेंद्र मोदी यांच्या हातात देश सुरक्षित आहे. परंतु या देशात महिला सुरक्षित नाहीत. दिल्लीत आंदोलनास बसलेल्या खेळाडू महिलांकडे बघायला तुम्हाला वेळ नाही. मणिपूरात महिलांची नग्न धिंड काढल्यानंतर तिकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह का जात नाहीत, असा सवालही उद्धव ठाकरेंनी भाजपाला विचारला आहे. कर्नाटकातील प्रज्वल रेवन्ना फरार झाला. आता ४ जून पर्यंत थांबा, ५ जूननंतर तुम्ही सुरतच्या बिळात जरी लपलात तरी ते बीळ खोदून तुमच्या शेपट्या धरून तुम्हाला आम्ही उलटे लटकवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

नगरमधील महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी इंडिया आघाडीवर टीका केली होती. ते म्हणाले होते की, ४ जून ही इंडिया आघाडीची एक्सपायरी डेट असून त्यानंतर या आघाडीचे झेंडे उचलायलाही कोणी मिळणार नाही, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली होती. याचा अर्थ असा होतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींना म्हणायचे आहे की – देशात फक्त भाजपा एकटा पक्ष राहणार आहे आणि विरोधक भाजपामध्ये सामील होतील. परंतु असे होणे नाही. कारण देशात लोकशाही प्रणित राज्यकारभार आहे तसेच भारतीय संविधानही आहे त्यामुळे भारतीय लोकशाहीची बूज पंतप्रधान मोदी राखत नाहीत तसेच दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी नगरमध्ये असे म्हणाले की, देशात तिसऱ्या टप्प्याचे मतदान सुरू आहे. प्रत्येक ठिकाणी भाजपाला समर्थन मिळत आहे. तिसऱ्या टप्प्याच्या मतदानाने एक गोष्ट स्पष्ट केली असून ती म्हणजे ४ जून रोजी इंडिया आघाडीची एक्सपायरी डेट निश्चित केली आहे. त्यानंतर इंडिया आघाडीचे झेंडे उचलायलाही कोणी सापडणार नाही. कारण निवडणुकीपूर्वी विरोधी राजकीय पक्षांत अस्थैर्य दिसत आहे, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात संविधानविरोधी घडामोडी होत असल्याचे उद्धव ठाकरे यांनी जनतेच्या लक्षात आणून दिले. आता विरोधकांच्याही लक्षात येत आहे की, देशात संविधानविरोधी घडामोडी होत असून लोकशाहीविरोधी कायदे येत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विरोधक सत्ताधार्यावर टीका करत असल्याचे दिसते. यावेळेची लोकसभा निवडणूक वेगळी आहे असे दिसते. कारण जनतेच्या संतप्त प्रतिक्रिया सत्ताधाऱ्याविरोधात येत आहेत आणि देशात बदल व्हावा असे सर्वांनाच वाटत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रत्येक सभेत विरोधकांना हीन मानून टीका करत असल्याचे दिसतात. देशात सर्व काही चांगले असते तर सत्ताधाऱ्यांना विरोध झाला नसता. परंतु सत्ताधारीच विरोधकांना हीन पातळीवर संबोधत असताना जनता त्यांच्याकडे दिनवाणीपणे पाहत आहे असे दिसते. गेल्या काही वर्षांत मणिपूर येथील हिंसाचार, निवडणूक रोखे गैरव्यवहार व झुंडशाही, अल्पसंख्यांकावर अत्याचार असे अनेक गैरप्रकार झाले आहेत. त्याचे स्पष्टीकरण सत्ताधारी पक्ष देऊ शकलेला नाही. यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात जनमत तयार झाल्याचे दिसते. गेल्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक पक्ष फोडून अस्थैर्य निर्माण केले होते. त्याचेच प्रतिबिंब आता महाराष्ट्रात दिसू लागले आहे. कोणीही कोणत्या पक्षात जात असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्रात अस्थैर्य कोणी माजवले हा प्रश्न विरोधक करत आहेत. सत्ताधार्यावर टीका का होत आहे याचे आत्मपरीक्षण केंद्र सरकारने नव्हे मोदी सरकारने करण्याची गरज वाटते.

# ठाणे महापालिका क्षेत्रात सर्व सर्व्हिस सेंटरमधील वाहने धुणे व इतर साफसफाईची कामे करण्यास मनाई

- पाणी टंचाईच्या शक्यतेमुळे पाणी बचतीसाठी महापालिकेने घातले निर्बंध
- उल्लंघन करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई
- नागरिकांनाही पाणी बचतीचे आवाहन

ठाणे (०६) : सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, गावे यांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्याचबरोबर, ठाणे महापालिका क्षेत्रातील विहिरी आणि कूप नलिका यांच्यातील पाण्याची पातळीही वेगाने कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात तीव्र पाणी टंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पाणी बचतीची आवश्यकता आहे. म्हणून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व सर्व्हिस सेंटरमधील वाहने धुणे, पाण्याने साफसफाई करणे यास मनाई करण्यात आली आहे. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रात, १० जून२०२४ पर्यंत दूचाकी, तीन चाकी, चारचाकी वाहने, मोठी वाहने धुणे, तसेच पाण्याने साफसफाई करणे या कामांवर पालिकेने निर्बंध घातले आहेत. या निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व्हिस सेंटरवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमांनुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असेही महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### नागरिकांनीही दक्षता घ्यावी

त्याचबरोबर, नागरिकांनीही पाण्याचा वापर काटकसरीने करून पाणी बचत करावी, असे आवाहन महापालिकेने केले.शक्यतो दररोज गाड्या धुतल्या जावू नयेत. त्याऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या केलेल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात, अशी सूचना महापालिकेने नागरिकांना केली आहे.

### पाणी जपून वापरण्यासाठी काही उपाय...

- **नागरिकांनी अत्यंत काटकसरीने पाण्याचा वापर करावा. त्यासाठी काही उपाय पुढीलप्रमाणे –**
- अंगणात पाणी मारू नये. नळ सुरू ठेऊन कपडे धुणे, भांडी घासणे, दात घासणे, दाढी करणे टाळावे.
- घरातील नळांची गळती तातडीने दुरुस्त करावी. सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत.
- मारतींच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होवू नये याची दक्षता घ्यावी. त्यासंदर्भात, तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा अशी गळती आढळल्यास संबंधीत इमारतीचे–सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल.
- आंघोळीसाठी शॉवर व बाथटबचा वापर करू नये. स्वच्छतागृहामध्ये डुअल फ्लशचा वापर करावा. इमारतीतील जिने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरू नये.
- पाण्याचा अनावश्यक साठा करू नये तसेच, साठा केलेले पाणी रोज सकाळी ओतून देण्याची सवय बंद करावी.
- इमारती / सोसायटी / संकुलांमधील तरण तलावासाठी पिण्याचे पाणी वापरू नये व वारंवार पाणी बदलण्यात येऊ नये.
- शक्यतो आठवड्यातील पाच दिवस धुण्यायोग्य सगळे कपडे एकत्र करुन एकाच दिवशी धुवावेत. इतर दिवशी गरज पडल्यास दररोज लागणारे छोटे कपडे हाताने कमी पाण्यात धुवावेत.
- कपडे धुण्याचे मशीन आठवड्यातून एकदा किंवा अगदी आवश्यक असेल तेव्हा दोनदाच आणि ते पूर्ण क्षमतेने वापरावे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होईल आणि मशीनचा वापर पूर्ण क्षमतेने होईल.
- कपडे धुण्याचे मशीन किंवा हाताने कपडे धुवून निर्माण होणारे निरुपयोगी पाणी साठवण करुन पुढचे २ दिवस फ्लशसाठी, बाथरुम धुण्यासाठी, गाड्या धुण्यासाठी तसेच बगीच्यासाठी वापरावे.
- पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा अत्यल्प असल्याने एक जबाबदार नागरिक म्हणून पाण्याचा अपव्यय टाळूया. पाणी वाचवूया आणि संभाव्य पाणीटंचाईचा सामना एकत्रितपणे करूया, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.






रविवार, दि. ५ मे रोजी, सिध्दीविनायक मल्टिपर्पज हॉल, गुरुदत्त कॉलनी, सातारा कोरेगाव रोड, सातारा येथे श्री दत्तसंस्थान अक्कलकोट, स्वामी भक्त परिवार, सातारा या संस्थेचे अध्यक्ष वि. म. काळे गुरुजी यांच्या सौजन्याने पुरस्कार वितरण व पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी लेखक/प्रकाशक – एन. ए. कदम लिखित 'संस्था ट्रस्ट चालितांना' या पुस्तकाचे प्रकाशन, आणि प्रा. डॉ. रविंद्र ठोके (नि)(वनस्पतीशास्त्र विभाग) लिखित 'माऊली विश्वप्रार्थना' या पुस्तकाचे प्रकाशन विश्वगुरू ह.भ.प. नामदेव महाराज हरड (हिंदू शीख महासभा उपाध्यक्ष, काशी विद्वत परिषद, प्रभारी विश्वगुरू) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच सामाजिक कार्यात भरीव काम करणाऱ्या सौ. दर्शना जोशी (नाशिक जिल्हा महिला अध्यक्षा, अंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशिय संस्था) यांना 'राज्यस्तरीय रणरागिणी' पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. त्याबरोबर महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, साहित्यिक, सेवा व इतर क्षेत्रात काम करणाऱ्या नामांकित मान्यवरांना (एकूण ५५ जणांना) पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. अशोक भोईटे (माजी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), कल्याण हनुमंत कुलकर्णी (वावरहिरे), स्वामी आनंदकाडसिध्देश्वरानंद (आसुर्ले), बिपीन बिहारी दासप्रभू (आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ, सातारा), क्षीतेश्वर महाराज (विद्यावाचस्पती, क्षितेश्वर ज्ञानमंदिर, सुरली), प्रविण भोसले महाराज (ज्योतीर्लिंग देवस्थान, गोळीबार मैदान सातारा), संग्राम बर्गे (अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र युवा संघटना) आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याला विविध संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली.

### दिग्गज नेत्यांच्या सभांनी कल्याण डोंबिवली गाजणार

**(पान १ वरून)** ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि भिवंडी लोकसभेत महाविकास आघाडी व महायुतीचे उमेदवार यांच्यात तुल्यबळ लढत होणार आहे. उमेदवारांच्या प्रचार सभांसाठी ददिग्गज नेते मंडळी पुढील आठवड्यात कल्याण डोंबिवलीच्या दौऱ्यावर आहेत.

येत्या १२ मे , १३ मे आणि १५ मे रोजी दोन्ही लोकसभा मतदार संघात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे या दिग्गज नेत्यांच्या सभा होणार आहेत.

महायुतीला पाठिंबा दिल्यापासून मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेत आहेत. कल्याण लोकसभेत एक सभा घेण्याचे आश्वासन खासदार डॉ. शिंदे यांच्या मागणीवरून राज ठाकरे यांनी दिले असून येत्या १२ मे रोजी डोंबिवलीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे खासदार शिंदे यांच्या प्रचारार्थ जाहिर सभा घेणार आहेत, या सभेला मुख्यमंत्री सुद्धा उपस्थिती राहू शकतात, असे मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी सांगितले.

तर १३ मे रोजी डोंबिवलीत सावळाराम क्रीडा संकुल मध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे सभा घेणार आहेत, असे ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ यांनी सांगितले.

दुसरीकडे १२ मे रोजी भिवंडी लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र (बाळया मामा) म्हात्रे प्रचारार्थ शरद पवार हे स्वतः सभा शहापूर आणि कल्याणमध्ये घेणार आहेत.

दरम्यान भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीचे कपील पाटील यांच्या विरुध्द राष्ट्रवादीचे सुरेश म्हात्रे, नीलेश सांबरे यांच्या बरोबर लढत होणार आहे. हा गड सहजासहजी राखणे भाजपला यावेळी जड जात असल्याने अखेरच्या टप्प्यात मोदी पंतप्रधान येत्या १५ तारखेला कल्याण पश्चिमेत सभा घेणार आहेत.त्यामुळे येत्या काही दिवसात राजकीय घमासान पहायला मिळेल.

### शिळफाट्याचा प्रवास आता सुस्साट होणार

**(पान १ वरून)** करण्यात आली आहे. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर तसेच आसपासच्या भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना ठाणे, नवी मुंबईला जाण्यासाठी ह. भ. प. संत सावळाराम महाराज कल्याण शीळ मार्ग हा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मागील वर्षी या रस्त्याचे सहा पदरीकरण करून येथील वाहनचालकांना दिलासा देण्यात आला होता. तर या मार्गावरील प्रवास अधिक वेगवान होण्यासाठी या मार्गावरील पुढील टप्पा असलेल्या मुंब्रा परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील शिळफाटा जंक्शन येथे उभारण्यात आलेल्या सहा पदरी उड्डाणपुलाच्या उर्वरित सहा मार्गिका आता खुल्या करण्यात आल्या आहेत.

यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उड्डाणपुलाच्या तीन मार्गिका खुल्या करण्यात आल्या होत्या, ज्यावरून दोन्ही बाजूंची वाहतूक होत होती. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी एमएमआरडीकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या पुलाची उभारणी करण्यात आली आहे. या उड्डाणपुलामुळे बदलापूर ते डोंबिवली येथून कल्याण शीळ मार्गे ठाणे आणि नवी मुंबई प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळणार असून अधिक वेगवान प्रवास करता येणार आहे. यामुळे वाहन चालकांच्या वेळेची आणि इंधनाचीही बचत होणार आहे.

### ठाण्याला लागलेला गद्दारीचा कलंक पुसायचा आहे !

**(पान १ वरून)** संघटक राजेश्री सुर्वे, सुनंदा देशपांडे, वैशाली शिंदे, युवासेना आरती खळे, पूजा भोसले, विद्या कदम, ज्योती दुग्गल, उषा बोरुडे, गीता चव्हाण, कविता नार्वेकर, काँग्रेस चे अध्यक्ष विक्रांत चव्हाण, राष्ट्रवादी अध्यक्ष सुहास देसाई, राष्ट्रवादी युवा अध्यक्ष विक्रम खामकर, महेश म्हात्रे सरचिटणीस काँग्रेस, आपचे सलुजा, संभाजी ब्रिगेडचे चंद्रशेखर पवार तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आज सकाळी घोडबंदर येथील हायलँड पार्क ढोकाळी येथून प्रचाराला सुरूवात झाली. रुणवाल सिटी येथून पुढे बाळकुम नाका, दादलानी पार्क, बाळकुम पाडा, लोढा कॉम्प्लेक्स, माजिवडा गाव, ऋतू पार्क,आनंद पार्क, श्रीरंग सोसायटी,वृंदावन सोसायटी, रुस्तमजी, पंचगंगा,राबोडी, मीनाताई ठाकरे चौक,गोकुळ नगर गोल्डन डाईज, नारळीपाडा, रुणवाल नगर, कोलवाड, जागमाता मंदिर,कोलबाड, प्रताप सिनेमा, खोपट, गोकुळदास, सिद्धेश्वर तलाव, टेंभी नाका,सिविल हॉस्पिटल,उथळसर, सेंट्रल मैदान पोलीस लाईन, धर्मवीर शक्तीस्थळ,खारकर आळी, सिडको, स्टेडियम ठाणा कॉलेज,खारटन रोड, तलावपाळी सिग्नल, काँग्रेस कार्यालय अशा परिसरातून प्रचाराची रॅली निघाली.

### नरेश म्हस्के यांच्या प्रचारात भाजप सक्रीय

**(पान १ वरून)** करण्यास भाजप कार्यकर्ते तयार नसल्याचे सांगितले होते. संजीव नाईक यांना उमेदवारी डावल्याने त्यांच्या भाजप मधील समर्थकांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली होती. ही नाराजी दूर करण्यासाठी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. या दोघांच्या प्रयत्नांनामुळे नाराजी नाट्य संपुष्टात आले. त्यामुळे सोमवारपासून मिरा भाईंदर भाजपने महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारास सुरुवात केल्याचे दिसून आले. मंगळवारी म्हस्के यांच्या मिरा भाईंदर मधील प्रचार रॅली मध्ये माजी आमदार नरेंद्र मेहता व त्यांच्या समर्थका सहभागी झाले होते.

दररोज वाचा दैनिक महाराष्ट्र सम्राट

### राज्यातील प्रमुख लढती

**(पान १ वरून)**

- रत्नागिरी–सिंधुदुर्गात भाजपचे नारायण राणे विरुद्ध ठाकरे गटाचे विनायक राऊत अशी लढत आहे.
- धाराशिवमध्ये ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर विरुद्ध राष्ट्रवादीच्या अर्चना पाटील अशी लढत होत आहे.
- साताऱ्यात भाजपचे उदयनराजे भोसले विरुद्ध शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे अशी लढत आहे.
- कोल्हापूरमध्ये शिवसेनेचे संजय मंडलिक विरुद्ध काँग्रेसचे शाहू महाराज अशी लढत आहे.
- सांगलीत भाजपचे संजयकाका पाटील विरुद्ध ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील विरुद्ध काँग्रेसचे बंडखोर उमेदवार विशाल पाटील अशी तिरंगी लढत आहे.
- माढ्यात भाजपचे रणजित नाईक–निंबाळकर विरुद्ध शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते–पाटील अशी लढत आहे.
- बारामतीत शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या सुनेत्रा पवार असा नणंद–भावजय सामना आहे.
- हातकणंगलेमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे सत्यजीत पाटील विरूद्ध शिंदे गटाचे धैर्यशील माने यांच्यात लढत होत आहे.

### ट्रकमधून केमिकल पावडर पडली – ठण्याकडील वाहतूक ठप्प

**(पान १ वरून)** वाहतूक ठप्प झाली. तर घटनास्थळी शहर वाहतूक पोलीस कर्मचारी ०१– जेसीबी वाहनासह, अग्निशमन दलाचे जवान वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. वाहनांमधून रस्त्यावरती पडलेली सुमारे ३ टन झहींहरश्रळल रपहूवीळवश केमिकल पावडर शहर वाहतूक पोलीस कर्मचारी यांच्याकडून जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याच्या एका बाजूला करण्यात आली असून अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्त्यावरती पाणी मारून रस्ता पूर्णपणे साफ करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला

### नकली नोटा चलनात आणण्याचा प्रयत्न फसला

**(पान १ वरून)** युवकाला ताब्यात घेतले. यावेळी तो दिल्लीचा राहणारा असल्याचे पोलिसांना समजले. दिल्लीत तो रॅपिडो बाईक चालवितो. कल्याणमध्ये त्याच्या एका नातेवाईकाच्या घरी आला होता. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे १३ हजार रुपयांची रोकड सापडली. धक्कादायक म्हणजे त्याच्याकडे सापडलेल्या सर्व नोटा नकली होत्या. या प्रकरणाचा तपास कल्याणचे डिसीपी सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनखाली वरिष्ठ पोलिस निरिक्षक शैलेश साळवी यांच्या नेतृत्वात सुरु झाला.

अंकुश सिंह याला या नोटा चालविण्यासाठी दिल्लीतील एका व्यक्तीने दिल्या होत्या. या नोटा त्याने चालविल्यास त्याला पुढेही काम दिले जाईल असे समोरच्या व्यक्तीने सांगितले. समोरच्या व्यक्तीच्या शोधासाठी पोलिस पथक दिल्लीला रवाना झाले आहे अशी माहिती गुंजाळ यांनी दिली.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01050/18/24
Inquiry/case No. : ACC/III/203/2024
Name of the Trust : AAROGYA SHREE CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** B-102, RAJESHWARI PARK, PHASE-II, TISGAON, THANE, KALYAN, KALYAN
**Name of the Applicant :** DR. PRADEEP LAXMI SAHU

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 30/04/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/15087/18/23
Inquiry/case No. : ACC/II/1409/2023
Name of the Trust : ST. FRANCIS XAVIER CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** 1 SURVEY NO. 10, HISSA NO. 3, CHOUK VILLAGE, DHAVGI ROAD, NEAR LA SIMMER RESORT, BHAYANDER (W), THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** SMT. JOYCEE DEVIDAS INGLE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 30/04/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## भारतीय आर्थिक/सांख्यिकी सेवा परीक्षा

- जागा : ४८ जागा
- IES भारतीय आर्थिक सेवा परीक्षा
- ISS भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
- शैक्षणिक पात्रता:
- IES : पदव्युत्तर पदवी. (Economics/Applied Economics/ Business Economics/Econometrics)

ISS: nXdr (Statistics/Mathematical Statistics/Applied Statistics) किंवा पदव्युत्तर पदवी (Statistics/ Mathematical Statistics/Applied Statistics)
वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २१ ते ३० वर्षे, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/PWD/महिला:फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० एप्रिल २०२४
- परीक्षा: २१ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## मुंबई नेव्हल डॉकयार्ड

- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)

१ इलेक्ट्रिशियन
२ इलेक्ट्रोप्लेटर
३ फिटर
४ फाउंड्रीमन
५ मेकॅनिक
६ इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक
७ मशीनिस्ट
८ चचढच्
९ पेंटर
१० पॅटर्न मेकर
११ पाईप फिटर
१२ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
१३ मेकॅनिक Reff.
१४ शीट मेटल वर्कर ०३
१५ शिपराईट (Wood) १८
१६ टेलर (G) ०३
१७ वेल्डर (G E) २०
१८ मेसन (BC) ०८
१९ I CTSM² ०३
२० शिपराईट (Steel) १६
२१ रिगर १२
२२ फोर्जर  हीट ट्रीटर ०१

- शैक्षणिक पात्रता:

रिगर: ०८वी उत्तीर्ण
फोर्जर  हीट ट्रीटर: १०वी उत्तीर्ण
उर्वरित पदे: संबंधित ट्रेड मध्ये ITI (NCVT/SCVT)
- शारीरिक पात्रता: उंची छाती वजन १५० सेमी फूगवून ०५ सेमी जास्त ४५

वयाची अट: किमान १४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० मे २०२४
- परीक्षा: मे/जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.indiannavy.nic.in/

## भारतीय सैन्य

- कोर्सचे नाव: 140th टेक्निकल पदवीधर कोर्स जानेवारी २०२५
- पदाचे नाव: TGC
- शैक्षणिक पात्रता: संबंधित विषयात इंजिनिअरिंग पदवी किंवा इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षातील उमेदवार.
- वयाची अट: जन्म ०२ जानेवारी १९९८ ते ०१ जानेवारी २००५ दरम्यान.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत संकेतस्थळ https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च  डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- : फी नाही.
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

- Grand Total : २७०७ जागा (८६१+१११३+७३३)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ८६१ जागांसाठी भरती (नागपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या १११३ जागांसाठी भरती (रायपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ७३३ जागांसाठी भरती (बिलासपूर)
- जाहिरात क्र.: P/NGP/SAS/२०२४/१६
- आस्थापना क्र.: E०५२०२७०२६९५  E०५२०२७०२४९४
- Total: ८६१ जागा
- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
- शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
- वयाची अट: १० एप्रिल २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: नागपूर
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://secr.indianrailways.gov.in/

## ‘सावली होईन सुखाची’ मालिका घेणार अनपेक्षित वळण

नियतीच्या मनात नेमकं काय चालू आहे आणि अचानक आयुष्य कोणत्या वळणावर येऊन अडकणार याचा अंदाज कोणीच बांधू शकत नाही. अशाचप्रकारे एक मोठं संकट ‘सावली होईन सुखाची’ या मालिकेतील रुद्रा, गौरी आणि बिट्टी यांच्या आयुष्यात आलं आहे. प्रेक्षकांना कथेच्या मालिकेशी खिळवून ठेवण्यात सन मराठी वाहिनीला नेहमीच यश येतं. ‘सावली होईन सुखाची’ या मालिकेत आता मोठा ट्विस्ट घडणार आहे. मालिकेची कथा काही महिने पुढे सरकली आहे.

गौरी आणि बिट्टी यांचं नेमकं काय नातं आहे याचा खुलासा झाला असून रुद्राला खरं कळलं आहे की गौरी आणि बिट्टी या नात्याने खऱ्या माय लेकी नाहीत. या कारणास्तव गौरी आणि बिट्टी यांना घरातून काढून टाकले जाते. हे दुःख त्या दोघींनी कसं पचवलं असेल? या प्रसंगानंतर गौरी आणि बिट्टी यांनी रेल्वे ट्रॅकवर आत्महत्या केल्याची बातमी रुद्राच्या कानावर येते आणि हे ऐकून रुद्राच्या पायाखालची जमीन सरकते.

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल

- परीक्षेचे नाव: संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२४
- जागा : ५०६
- पदाचे नाव: असिस्टंट कमांडंट

1 BSF
2 CRPF
3 CISF
4 ITBP
5 SSB
- शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
- शारीरिक पात्रता:

पुरुष/महिला उंची छाती वजन
पुरुष १६५ से.मी. ८१-८६ से.मी. ५० ज्ञस
महिला १५७ से.मी. - ४६ ज्ञस
- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/महिला: फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १४ मे २०२४
- लेखी परीक्षा: ०४ ऑगस्ट २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mha.gov.in/en/about-us/central-armed-police-forces

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc.(-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising  Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव
- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

# तुम्ही उन्हाळ्यात रोज ताक किंवा लस्सी प्यायल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल?

**यंदा उन्हाची तीव्रता खूपच जास्त आहे. उष्णतेच्या लाटांमुळे देशभरातील नागरिक घामाघूम आहेत. तसेच अनेकांना त्वचेच्या अनेक समस्यांनादेखील सामोरे जावे लागत आहे. उन्हाळ्यात शरीराला जास्त पाण्याची आवश्यकता भासते, त्यामुळे तहानही भरपूर लागते. उन्हाळ्यात ताक, दही, लस्सी प्यावी असा सल्ला तज्ज्ञ देतात. उन्हाळ्यात ताक आणि दही या दोन्ही पदार्थांचे सर्वात जास्त सेवन केले जाते. हे दोन्ही पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. दूधापासून तयार करण्यात येणाऱ्या या दोन्ही पदार्थांमध्ये पोषक घटक समाविष्ट असतात. मात्र, असे असले तरी उन्हाळ्यात दही खाण्याऐवजी ताक पिणे योग्य असते असे म्हटले जाते. पण, उन्हाळ्याच्या उकाड्यावर मात करण्यासाठी तुम्ही रोज लस्सी किंवा ताक प्यायल्यास तुमच्या शरीराचे काय परिणाम होईल, याचविषयावर आहारतज्ज्ञ डॉ. तृप्ती पाधी यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ**

डॉ. पाधी यांच्या म्हणण्यानुसार, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी कमी होते, त्यामुळे उन्हाळ्यात आरोग्यदायी आणि पौष्टिक पेयाचा आपल्या आहारात समावेश करणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात गोड लस्सी पिण्याची मजा काही औरच असते. लस्सी आपल्याला हायड्रेटेड तर ठेवतेच, पण पचनशक्तीही निरोगी ठेवते. लस्सी प्यायल्याने शरीर आतून थंड राहते, तर ताक कमी चरबीयुक्त दुधापासून बनवले जाते, त्यामुळे त्यात फॅट नसते. अगदी जुन्या पद्धतीच्या ताकातही फॅट नसते. त्यामुळे ताकही तुमच्यासाठी फायदेशीर आहे. त्यांनी हे ही स्पष्ट केले की, या पेयांपैकी एक ग्लास (किंवा दोन) तुमच्या दैनंदिन नित्यक्रमात समाविष्ट करणे हे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

रोज ताक किंवा लस्सी प्यायल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल?

### शरीर हायड्रेट राहतं

लस्सी आणि ताक हे दोन्ही द्रवपदार्थांचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत, जे तुम्हाला दिवसभर हायड्रेटेड ठेवतील. गरम हवामानात हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

### पचनक्रिया सुधारते

या पेयांमधील प्रोबायोटिक सामग्री पचनास मदत करते, गॅस आणि ब्लोटिंगसारख्या समस्या दूर करते. दोन्हीं पेयांमध्ये विविध प्रकारचे पोषक घटक असतात, जे पोटाचे खराब आरोग्य बरे करून एकूण आतड्याचे आरोग्य सुधारते.

### निरोगी हृदय

दोन्हीं पेयांचा नियमित सेवन केल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते, निरोगी हृदयाला चालना मिळते.

### मजबूत हाडे आणि दात

हाडांमध्ये वेदना होणे आणि तरुण वयात हाडांचे आजार टाळायचे असतील तर या दोन्हीं पेयांचे सेवन जरूर करा. कारण हे कॅल्शियमने समृद्ध आहे, हाडांना त्याचा फायदा होऊ शकतो.

### प्रतिकारशक्ती वाढते

या दोन्ही पेयांमध्ये भरपूर लॅक्टिक सिड असते, त्याचप्रमाणे त्यात व्हिटॅमिन डी ही भरपूर असते. हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. चयापचय गती वाढवते, ज्यामुळे वजन कमी करण्यात कोणतीही अडचण येत नाही.

शेवटी डॉ. पाधी म्हणतात, हे लक्षात ठेवा, दोन्ही पेय सुरक्षित असले तरी जास्त प्रमाणात सेवन केल्याने पचनात अस्वस्थता किंवा कॅलरी सामग्रीमुळे वजन वाढू शकते. त्यामुळे अतिप्रमाणात सेवन करणे टाळलेलेच बरे. जरी लस्सी आणि ताक हे बहुतेक लोकांसाठी सुरक्षित असले, तरी तुम्हाला तुमच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही समस्या असल्यास हेल्थकेअर व्यावसायिकांचा सल्ला नक्की घ्या.



# मुंबई इंडियन्सचा सनरायझर्स हैदराबादला पराभवाचा धक्का

## सूर्या तळपेला




मुंबई : ‘आयपीएल २०२४’मध्ये गुणतालिकेत तळाच्या स्थानावर ठाण मांडून बसलेल्या मुंबई इंडियन्सला अखेर विजय गवसला. सोमवारी झालेल्या सामन्यात मुंबईने हैदराबादला ७ विकेटस्नी हरवले. सूर्यकुमार यादवने शतक झळकावत मुंबईच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. सनरायझर्सने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १७३ धावा केल्या, हे आव्हान मुंबईने १६ चेंडू राखून पूर्ण केले. या विजयाने मुंबई इंडियन्स संघ तळातून एक स्थान वर म्हणजे नवव्या स्थानावर आला आहे. तर हैदराबादच्या पराभवाने चेन्नई सुपर किंग्जचा थोडा फायदा झाला आहे.

इशान किशन व रोहित शर्मा यांनी मुंबईला पहिल्याच षटकात १३ धावा कुटून दिल्या. मार्को जान्सेनच्या दुसर्या षटकात १३ धावा आल्या होत्या. परंतु, त्याने इशानला (९) स्लीपमध्ये झेल देण्यास भाग पाडले. भुवनेश्वर कुमारने अप्रतिम इनस्वींगवर नमन धीरला अचंबित केले होते. भुवीने चांगले दडपण निर्माण केले होते आणि त्याचा फायदा पॅट कमिन्सने चौथ्या षटकात उचलला. रोहित शर्मा (४) याने मारलेला चेंडू बराच वेळ हवेत राहिला आणि हेन्रिक क्लासेनने सहज झेल टिपला. मुंबईला ३१ धावांवर दोन धक्के बसले. कमिन्सने त्यानंतर पुढच्या तीन चेंडूंवर सूर्यकुमार यादवला चकवले. सूर्याला काहीच समजेनासे झाले. मुंबईचे फलंदाज दडपणात दिसले आणि भुवीने पुढच्या षटकात नमनला भोपळ्यावर (९ चेंडू) माघारी पाठवले. बिनबाद २६ वरून मुंबईचा डाव ३ बाद ३१ असा घसरला.

सुरुवातीला मोठे धक्के बसल्यानंतर मुंबईचा डाव सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी सावरला. त्यांनी मुंबईला १०० धावांचा टप्पा सहज पार करून दिला. या दरम्यान सूर्यकुमारने ३० चेंडूंत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतक केल्यानंतरही सूर्यकुमारने आपली लय कायम ठेवली आणि शतक ठोकले. या सामन्यात मुंबईला विजयासाठी ६ धावांची गरज असताना सूर्यकुमारने १८ व्या षटकाच्या दुसर्या चेंडूवर टी नटराजनविरुद्ध खणखणीत षटकार ठोकला आणि शतक पूर्ण करण्याबरोबरच मुंबईच्या विजयावरही शिक्कामोर्तब केले. त्याने ५१ चेंडूंत १२ चौकार आणि ६ षटकारांसह १०२ धावांची नाबाद खेळी केली. त्याला तिलक वर्मानेही ३२ चेंडूंत ३७ धावांची नाबाद खेळी करत भक्कम साथ दिली. ३ बाद ३१ धावा अशा स्थितीतून या दोघांनी १४३ धावांची नाबाद भागीदारी करत मुंबईला ७ विकेटस्ने विजय मिळवून दिला. हैदराबादकडून भुवनेश्वर कुमार, मार्को जान्सेन आणि पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

तत्पूर्वी, मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी दम दाखवला. टी-२० वर्ल्डकप स्पर्धे पूर्वी हार्दिक पंड्याचे फॉर्मात येणे भारतासाठी शुभ संकेत आहेत. त्याने हैदराबादच्या ३ फलंदाजांना माघारी पाठवले. ३५ वर्षीय फिरकीपटू पीयूष चावलाने ३ मोठ्या विकेटस् घेऊन सामन्याला कलाटणी दिली. जसप्रीत बुमराहने त्याची इकॉनॉमी कायम राखताना २३ धावांत १ विकेट घेतली. पदार्पणवीर अंशुल कंबोज थोडा कमनशीबी ठरला. कारण, त्याच्या चेंडूवर ट्रॅव्हिस हेडला दोनवेळा जीवदान मिळाले; पण त्याने ४२ धावांत १ विकेट घेतली. नुवान तुषारा (४२) हाही महागडा ठरला. हैदराबादकडून हेडने ३० चेंडूंत ७ चौकार व १ षटकारासह ४८ धावा केल्या. कर्णधार पॅट कमिन्सने १७ चेंडूंत नाबाद ३५ धावा करून संघाला ८ बाद १७३ धावांपर्यंत पोहोचवले. नितीश कुमार रेड्डी (२०), मार्को जान्सेन (१७) यांनीही योगदान दिले.

संक्षिप्त धावफलक

सनरायझर्स हैदराबाद : २० षटकांत ८ बाद १७३ धावा. (ट्रॅव्हिस हेड ४८, पॅट कमिन्स ३५. हार्दिक पंड्या ३/३१.)

मुंबई इंडियन्स : १७.२ षटकांत ३ बाद १७४ धावा. (सूर्यकुमार यादवम, तिलक वर्मा ३७*. भुवनेश्वर १/२२.)

# ठाण्यात रिपाइंला खिंडार

## महिलाध्यक्षांसह शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश




ठाणे : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाला ठाण्यात मोठे खिंडार पडले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत रिपाइंच्या ठाणे जिल्हा महिलाध्यक्षा मनिषा करलाद यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादीत प्रवेश केला.

वैशाली दरेकर यांच्या प्रचारार्थ आज सायंकाळी विटावा येथे सभेचे आयोजन केले होते. या सभेस डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्यासह शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे, मा. विरोधीपक्ष नेते मिलींद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मनिषा करलाद यांनी विटावा, रेतीबंदर, माजीवडा आदी भागातील कार्यकर्त्यांसह हा पक्ष प्रवेश केला.

रामदास आठवले हे भाजपसोबत गेले आहेत. सध्या भाजपकडून संविधानविरोधी भूमिका घेतली जात आहे. त्याविरोधात लढण्याची भूमिका घेण्याऐवजी आठवले भाजपला साथ देत असल्याने आपण संविधान रक्षणासाठी शरदचंद्र पवार आणि डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत काम करणार आहोत, असे करलाद यांनी सांगितले. डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी करलाद आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हाती पक्षाचा झेंडा देऊन त्यांचे स्वागत केले.

# स्वार्थासाठी एकत्र आलेल्यांना नव्हे, तर देशासाठी एकत्र आलेल्यांना निवडून द्या!

## इंडिया आघाडीवर टीका करत महायुतीला निवडून देण्याचे डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आवाहन

ठाणे (गणेश भोईटे) : स्वार्थासाठी एकत्र आलेल्यांना नव्हे, तर देशासाठी एकत्र आलेल्यांना निवडून द्या, असे म्हणत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी इंडि आघाडीवर टीका करताना महायुतीला निवडून देण्याचे आवाहन केले. कल्याण लोकसभेतील डोंबिवली, कल्याण पूर्व आणि कळवा येथे महायुतीच्या निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन सोमवारी करण्यात आले. याप्रसंगी खासदार शिंदे बोलत होते. याप्रसंगी उपस्थित महायुतीच्या कार्यकर्त्यांनी महायुतीच्या मोठ्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.



याप्रसंगी बोलताना ही निवडणूक एका व्यक्तीची नसून देशाची, देशाचे भवितव्य आणि दिशा ठरवणारी निवडणूक असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील १० वर्षात देशाने मोठी प्रगती केली असून प्रत्येक क्षेत्रात देश पुढे गेला आहे. भारताची अर्थव्यवस्था पहिल्या पाचात आली असून लवकरच ती पहिल्या ३ मध्ये येईल, असा विश्वास व्यक्त करत केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच समस्त देशवासीयांची ५०० वर्षांची प्रतीक्षा संपून आयोजित भव्य राममंदिर उभे राहिले, असेही खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले.

दुसरीकडे केंद्र आणि राज्य सरकारच्या भक्कम पाठबळाने कल्याण लोकसभेतही मागील १० वर्षात विक्रमी विकासकामे झाली असून कल्याण शिळ रस्त्याचे सहा पदरीकरण आणि काँक्रीटीकरण, शिळफाटा येथे उड्डाणपूल, मुंब्रा वाय जंक्शन येथे उड्डाणपूल, डोंबिवली एमआयडीसीतील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पत्री पूल, काटई ऐरोली फ्री वे, काटई रांजणोली एलिवेटेड मार्ग, कॅशलेस हॉस्पिटल, लहान मुलांसाठी एनआयसीयू, मेट्रो या काही प्रमुख कामांसह इतर अनेक प्रकल्प कल्याण लोकसभेत पूर्ण झाले असून काही प्रकल्प हे प्रगतीपथावर आहेत, तसेच लवकरच कल्याण डोंबिवलीत मेट्रोही येणार असल्याचे खासदार शिंदे यांनी सांगितले. यंदा शिवसेना आणि भाजपासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसे यांचीही शक्ती एकत्र आली असून त्यामुळे महायुतीचे बळ मोठ्या प्रमाणात वाढल्याचे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले. त्यामुळेच येत्या २० मे रोजी आपणा सर्वांनी मोठ्या प्रमाणात मतदान करून महायुतीच्या मोठ्या विजयाचे शिल्पकार आणि साक्षीदार व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी शिवसेनेचे कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी आमदार जगन्नाथ आप्पा शिंदे राष्ट्रवादी काँग्रेसचे ठाणे जिल्हाध्यक्ष, माजी खासदार आनंद परांजपे, भाजपाचे कल्याण लोकसभा निरीक्षक शशिकांत कांबळे, जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, रमाकांत देवळेकर, डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, विधानसभा प्रमुख संतोष चव्हाण, युवासेना सचिव दीपेश म्हात्रे, मनसे शहराध्यक्ष राहुल कामत, मनोज घरत, भाजपाचे नंदू परब, शिवसेना महिला आघाडीच्या उपनेत्या विजया पोटे, महिला जिल्हा संघटक लता पाटील, महिला जिल्हा संघटक छायाताई वाघमारे रिपाइंचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब रोकडे यांच्यासह महायुतीतील सर्व घटकपक्षांचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनार्दन भगत यांच्या शैक्षणिक धोरणामुळे अनेकांची प्रगती : लोकनेते रामशेठ ठाकूर



पनवेल : गव्हाणसारख्या ग्रामीण भागामध्ये जनार्दन भगत यांनी शिक्षणाचे संकुल उभे केल्याने आमच्यासारख्या अनेकांना शिक्षण घेता आले,जनार्दन भगत यांच्या या शैक्षणिक धोरणामुळेच आज अनेकांची प्रगती झाली असल्याचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या ३६ व्या पुण्यतिथी निमित्त खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू काना ठाकूर कॉलेज ऑफ लॉ महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी सांगितले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्यावतीने खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू काना ठाकूर कॉलेज ऑफ लॉ महाविद्यालयामध्ये स्वर्गीय जनार्दन भगत यांची ३६ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यानिमित्ताने भागुबाई चांगू काना ठाकूर कॉलेज ऑफ लॉ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी नव्याने बांधण्यात आलेले उपहारगृह,लीगल ॲण्ड सेंटर,एनएसएस अँड डीएलएलइ ऑफिसचे उद्घाटन संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख,पनवेल महानगरपालिकेचे माजी गटनेते परेश ठाकूर,महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.या कार्यक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी देशमुख,पनवेल महानगरपालिकेचे माजी गटनेते परेश ठाकूर,संस्थेचे सदस्य संजय भगत,संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे,पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष एडवोकेट मनोज भुजबळ,वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, अमोघ प्रशांत ठाकूर, आदेश परेश ठाकूर, अपूर्व प्रशांत ठाकूर, प्राचार्या राज अलोनी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य एडवोकेट विनायक कोळी,गणेश कोळी, लॉ कॉलेजच्या प्राचार्या सानवी देशमुख आदी उपस्थित होत्या.

यापुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले,जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे जाळे फोफावत आहे.संस्थेच्या अनेक शाळा- महाविद्यालयांमध्ये पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम-उपक्रम साजरे होत आहेत. संस्थेच्या शाळा महाविद्यालयातून आज अनेक विद्यार्थी घडविले जात आहेत खारघर येथील विद्यालयाला शासनाचं मिळालेलं पारितोषिक ही सुद्धा संस्थेच्या दृष्टिकोनातून अभिमानाची गोष्ट आहे.जनार्दन भगत यांनी जनता, समाजासाठी कार्य केले. शिक्षणाचेही भरीव कार्य केले. त्यांनी रचलेल्या कार्याचा पाया अधिक मजबूत करूया असे शेवटी रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

# भिवंडीतून निलेश सांबरे यांचा अर्ज बाद, तरीही महाविकास आघाडीची डोकेदुखी कायम कशामुळे?

ठाणे : भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांनी दोन अर्ज भरले होते. त्यापैकी एक अपक्ष तर दुसरा काँग्रेसच्या नावाने भरला होता. परंतु काँग्रेसकडून अधिकृत उमेदवारी मिळून न शकल्यामुळे त्यांचा काँग्रेसच्या नावाने भरलेला अर्ज बाद झाला आहे. असे असले तरी त्यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज वैध ठरल्याने ते अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढणार असल्याचे आता जवळपास स्पष्ट झाले आहे.

जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे हे काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढण्यासाठी इच्छुक होते. त्यासाठी त्यांनी भारत जोडो न्याय यात्रेच्या मार्गावर राहुल गांधी यांच्या स्वागताचे फलक लावून वातावरण निर्मिती केली होती. सांबरे हे काँग्रेसच्या काही वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात होते. परंतु महाविकास आघाडीच्या जागा वाटपात भिवंडी लोकसभा मतदार संघाची जागा मिळताच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या पक्षाने सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांची उमेदवारी जाहिर केली. यानंतर लगेचच निलेश सांबरे यांनी जिजाऊ विकास आघाडीमार्फत अपक्ष उमेदवारी अर्ज भरण्याची घोषणा केली होती. परंतु त्यांनी दोन अर्ज भरले होते. त्यापैकी एक अपक्ष तर दुसरा काँग्रेस पक्षाच्या नावाने अर्ज भरला होता. यामुळे भिवंडीतील राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले होते. यानिमित्ताने सांबरे हे काँग्रेसचे तिकीट मिळेल या आशेवर असल्याचे चित्र दिसून आले होते.

काँग्रेसकडून सांबरे यांना अधिकृत उमेदवारी मिळू शकले नाही. यामुळे या मतदारसंघातील उमेदवारांच्या छाननी प्रक्रियेत सांबरे यांनी काँग्रेसच्या नावाने भरलेला अर्ज बाद झाला आहे. असे असले तरी त्यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज वैद्य ठरल्याने ते निवडणुकीच्या रिंगणात कायम असल्याचे चित्र आहे. यामुळे या मतदारसंघात अपक्ष उमेदवार निलेश सांबरे, भाजपचे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# वर्षभरात ९ हजार ३७३ वाहनांवर कारवाई

## नवी मुंबई 'आरटीओ'चे पाऊल

नवी मुंबई : दिवसेंदिवस वाढत्या अपघातांची संख्या याचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालवताना वाहतुकीचे नियम डावलून वाहने चालवली जातात. नवी मुंबई शहरातही वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. हे अपघात कमी करण्यासाठी वाशी आरटीओ विभागाकडून रस्ता सुरक्षा अंतर्गत वाहतूक नियम न पाळणाऱ्या वाहनांवर एप्रिल २०२३ पासून ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ९ हजारहून अधिक वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

आरटीओच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नेहमीच सुरक्षित प्रवास वाहतुकीचे धडे दिले जातात. हेल्मेट वापरणे, सीटबेल्ट लावणे, मोबाइलवर बोलत वाहन न चालविणे, डोन्ट ड्रिंक ॲण्ड ड्राइव्ह याविषयी जनजागृती किली जाते. सुरक्षित वाहतुकीचे नियम सांगितले जातात. तरीही वाहनचालक वाहतूक नियम पायदळी तुडवत बेशिस्तपणे वाहने चालवतात. कित्येकदा दुचाकीस्वार विनाहेल्मेट प्रवास करतात. परिणामी अनवधानाने अपघाताला निमंत्रण दिले जाते आणि हेल्मेट नसल्यामुळे त्यांच्या जिवावर बेतते. त्याचबरोबर चारचाकी वाहनचालकदेखील सीटबेल्ट न वापरता बेफिकिरपणे वाहन चालवतात. शिवाय वाहन चालवताना मोबाइलवरदेखील बोलत असतात . त्यामुळे यादरम्यान नजर हटी दुर्घटना घटी अशा घटना घडतात. अपघातांचे हे प्रमाण कमी करण्यासाठी वाशी आरटीओ विभागाने बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ९ हजार ३७३ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक कारवाई ही विनाहेल्मेट आणि योग्यता प्रमाणपत्र नसणाऱ्या वाहनचालकांवर करण्यात आली.

# १५ मेपर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश

नवी मुंबई : शहरातील सर्व प्राधिकरणांमध्ये परस्पर समन्वय रहावा व पावसाळी कालावधीत कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याचे तत्परतेने निराकरण व्हावे यादृष्टीने महापालिका आयुक्त तथा शहर आपत्ती व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. कैलास शिंदे यांनी यापूर्वी सर्व प्राधिकरणांच्या संयुक्त बैठकीत सूचित केल्याप्रमाणे नवी मुंबई महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पावसाळापूर्व कामांचा विभागनिहाय व सुविधानिहाय आढावा विशेष बैठकीत घेतला. त्यावेळी पावसाळापूर्व कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत.

शहर अभियंता विभागामार्फत विविध कामे शहरात सुरु आहेत. यामध्ये शहरातील सुरु असलेले चौकांचे काँक्रीटीकरण, विविध विभागातील पदपथ, खोदकामे, डांबरीकरण, विविध ठिकाणचे नाले, गटारे, गावठाणातील रस्ते, इमारती, समाजमंदिरे अशा विविध प्रकारची कामे करण्यात येत आहेत. त्यामुळे पालिका आयुक्तांनी शहरात सुरू असलेल्या कामांची सद्यास्थिती शहर अभियंता तसेच आठही विभागांचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून विभागवार जाणून घेतली. यावेळी सुरू असलेली कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी पावसाळा कालावधी लवकर सुरू होणार असून पावसाचे दिवस कमी असतील मात्र तीव्रता अधिक असेल हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने तयारीत राहावे असे आयुक्तांनी सूचित केले.

बेलापूर ते दिघा अशा आठही विभागात सुरु असलेल्या रस्ते, चौक आदी कामांची सदयस्थिती जाणून घेतानाच होल्डिंग पाँड व त्यावरील फ्लॅप गेट बसविण्याची कामेही तातडीने पूर्ण करुन घ्यावीत असे निर्देश दिले आहेत. शहरात गटारांची सफाई करताना गटारातून काढलेला गाळ अनेक दिवस तसाच पडून राहतो. त्यामुळे काढला जाणारा गाळ हा दोन ते तीन दिवसांतच उचलण्याची कार्यवाही काटेकोरपणे केली जावी असेही आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# मागील दहा वर्षात थकबाकीदारांच्या जप्त मालमत्तांकडे खरेदीदारांची पाठ

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता कर विभागाने गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत लाखो रुपयांच्या मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचे विहित प्रक्रिया पूर्ण करून लिलाव जाहीर केले होते. कोट्यवधी रूपये पालिकेला या लिलावातून मिळणार होते. परंतु, गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत अशाप्रकारे जाहीर करण्यात आलेल्या लिलाव बोलीतील एकाही थकबाकीदाराची मालमत्ता विकली गेली नसल्याची पालिकेच्या अभिलेखातील धक्कादायक माहिती माहिती अधिकारातून उघडकीला आली आहे. मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करायच्या असतील तर त्यासाठी पालिकेचा मालमत्ता कर विभाग संबंधिताला पहिले नोटिसा पाठवून थकीत रक्कम भरणा करण्याचे सूचित करतो. अशाप्रकारे तीन नोटिसा पाठविल्यानंतर संबंधित थकबाकीदाराने मालमत्ता कर थकबाकी भरणा केली नाही तर पालिका त्या मालमत्ता जप्त करते. अशा अनेक थकबाकीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्यानंतर पालिका प्रसिध्द वर्तमानपत्रात या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्याची आणि त्यांचा लिलाव जाहीर करते. या जाहिरातींसाठी पालिका लाखो रुपये खर्च करते. या मालमत्ता नागरिकांनी खरेदी कराव्यात म्हणून जनजागृती करते. मालमत्ता विक्रीला न गेल्याने पालिकेने खर्च केलेला सगळा पैसा फुकट जातो, असे माहिती कार्यकर्ते मनोज कुलकर्णी यांनी सांगितले.




नागरिकांनी मतदान करावी यासाठी २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात स्वीप पथकातर्फे 'मतदान जनजागृती' अभियान राबविण्यात आले.

# कर्नाळा पक्षी अभयारण्यात एप्रिलमध्ये २५ टक्केच पर्यटक

पनवेल : यंदा सर्वाधिक तापमानाची नोंद पनवेलमध्ये झाल्यामुळे येथील कर्नाळा पक्षी अभयारण्यात एप्रिल महिन्यात पर्यटकांची संख्या २५ टक्केच नोंदविली गेली आहे. ४४ अंश सेल्सिअसच्या तापमानामुळे मागील वर्षीपेक्षा साडेचार हजार पर्यटक एप्रिल महिन्यात कमी आल्याची नोंद वन विभागाकडे नोंदविली गेल्याने मे महिन्यात उन्हाचा पारा कमी असल्यास पर्यटकांना कर्नाळा किल्ला आणि येथील पक्षी अभयारण्यात भटकंती करता येईल.

दीडशेहून अधिक पक्षी, दुर्मीळ वृक्ष, प्राण्यांचा मुक्त वावर आणि कर्नाळा किल्ला या साऱ्या निसर्गसंपदेमुळे हे पक्षी अभयारण्य सुट्यांच्या दिवसात गिर्यारोहक, पक्षीप्रेमी, निसर्गमित्र आणि प्राणी मित्रांचे हक्काचे ठिकाण बनले आहे. कायम स्वरूपी वास्तव्यासोबत या अभयारण्यात स्थलांतरित पक्ष्यांची मोठी संख्या आहे. अनोख्या पक्ष्यांमुळे ज्येष्ठांसोबत बालकांना येथे वेळ घालवायला आवडतो. मात्र यंदाचा उन्हाळा न सोसावणारा असल्याने पर्यावरणप्रेमींनी कर्नाळाकडे पाठ फिरवल्याचे दिसते.

अभयारण्यातील प्राणीपक्ष्यांना उन्हाळ्याच्या झळांमध्ये पिण्याचे पाणी सुरळीत मिळावे यासाठी वन विभागाने ३० ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. पाण्याने भरलेले सिमेंटचे लहान पातेले प्राण्यांसाठी बनवून या पाणवठ्यांना पाण्याने भरत असल्याची माहिती वन विभागाचे अधिकारी एन. डी. राठोड यांनी दिली.

### २८५७ पक्षीप्रेमींची भेट

मागील वर्षी कर्नाळा पक्षी अभयारण्याला ७८ हजार ७४६ पर्यटकांनी भेट दिली. यामध्ये एप्रिल महिन्यात ७,३४८ पक्षी प्रेमी आले होते. मात्र यंदाच्या एप्रिल महिन्यात अवघे २,८५७ पक्षी प्रेमींची नोंद प्रवेशव्दाराच्या नोंदवहीत झाली. एप्रिल महिन्यात अभयारण्यात २,४१८ प्रौढ व्यक्ती, २७८ मुले, १५३ विद्यार्थी आणि ८ विदेशी नागरिक आल्याची नोंद झाली आहे. मात्र मागील अनेक वर्षात (करोनाकाळ वगळता) एप्रिल महिन्यात इतर वर्षांच्या तुलनेत ही संख्या अतिशय कमी असल्याचे वन विभागाचे कर्मचारी सांगतात.

# मतदार जनजागृतीसाठी आयुक्तांनी घेतली सामाजिक व व्यावसायिक संघटनांची बैठक

भिवंडी : आगामी लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसहभागाच्या दृष्टीने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कार्यरत सामाजिक स्वयंसेवी संस्था तसेच व्यावसायिक संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांची आज दि . ०७ मे २०२४ रोजी मनपा आयुक्त अजय वैद्य सर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली.




२३- भिवंडी लोकसभा मतदार संघासाठी आगामी २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या लोकसभा मतदारसंघात भिवंडी (ग्रामीण), भिवंडी (पूर्व), भिवंडी (पश्चिम), शहापूर, कल्याण (पश्चिम) व मुरबाड या सहा विधानसभा मतदारसघांचा समावेश आहे. त्यापैकी भिवंडी (पश्चिम) व भिवंडी (पूर्व) हे दोन विधानसभा मतदारसंघ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आहेत. या दोन मतदारसंघात अनुक्रमे २,९२,१०७ व ३,१७,३४६ मतदार आहेत. सन २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत संपूर्ण भिवंडी लोकसभा मतदारसंघात ५३% इतके मतदान झाले होते. तर भिवंडी (पश्चिम) मध्ये ५०% व भिवंडी (पूर्व) मध्ये ४७% इतके मतदान झाले. संसदिय लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध माध्यमांतून व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात येत आहे. शाळा व महाविद्यालयातून विविध प्रकारच्या स्पर्धा, पत्रलेखन, पथनाटये, वासूदेव, कव्वाली, पोवाडा, होडींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, स्टिकर्स, घंटागाडी, डिजिटल डिस्प्ले, प्रभातफेरी, महिला बचत गटांचे जनजागृतीपर मेळावे, सिनेमागृहे, मोहल्ला कमिटी बैठका, तृतीयपंथीय मतदारांच्या बैठका, गृहभेटी इ. याद्वारे भिवंडी शहरात मतदारांमध्ये जनाजगृती करण्यात येत आहे. यामध्ये स्वयंसेवी सामाजिक संस्थांचा तसेच व्यावसायिक संघटनांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. स्वयंसेवी समाज संस्थांनी समाजातील सर्व वंचित घटकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी आपल्या उपक्रमांतून प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणे व्यावसायिक संघटनांनी त्यांचे ग्राहक, अशील, सहयोगी सदस्य तसेच त्यांचे कर्मचारी यांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. यासाठी भिवंडी शहरातील सर्व सामाजिक स्वयंसेवी संस्था व व्यावसायिक संघटना यांनी पुढाकार घेवून मतदानाची टक्केवारी वाढविण्यसाठी प्रयत्न करावा, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

याप्रसंगी मनपा उपायुक्त प्रणाली घोंगे, अजय एडके, सहाय्यक आयुक्त निवडणूक नितीन पाटील वैद्यकीय अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, जॉईन ग्रुप ऑफ भिवंडी मेट्रोसहली सामाजिक संस्थेचे श्रीमती मनीषा भांगरे, गायत्री परिवार सामाजिक संस्थेचे डॉ. नीरज गुप्ता, हॉटेल असोसिएशन भिवंडी प्रज्वल शेट्टी, इंडियाचे कावेरी तनयारे, एमएसव्हीटीचे सोनू पंडित, किन्नर अस्मिता संस्थेचे रुमाना अन्सारी, एफपीएआय भिवंडीचे संध्या सोनारकर, अपूर्वा महिला सामाजिक संस्थेच्या निशा सिंह, एफएसडब्लू (एच. एम. टी.) राजश्री हिरे व राजेश पाठारे उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१